**श्रावकाचार-**

या ग्रंथाची रचना गुणभूषण यांनी केले आहे. स्वतः लेखकाने या ग्रंथाला भव्यजनचित्तवल्लभ म्हणून संबोधिले आहे. या ग्रंथाची रचना अंदाजे १४ ते १५ व्या शतकात झाली असावी. या ग्रंथात एकूण २६९ श्लोक असून त्यात दर्शन,ज्ञान व श्रावकधर्म असे प्रामुख्याने तीन उद्देश आहेत. या ग्रंथावर रत्नकरण्ड व वसुनंदी श्रावकाचार यांचा प्रभाव पडलेला आढळतो.

**उपसकाध्ययन-**

प्रस्तुत ग्रंथाची रचना आचार्य वसुनंदि यांनी केली आहे. या ग्रंथाला वसुनंदिश्रावकाचार असेहि म्हटले आहे. या ग्रंथाची रचना साधारणपणे १२व्या शतकाच्या पूर्वार्धात झाली असावी. पंडित आशाधर यांनी सागरधर्मामृतच्या टीकेत वसुनंदीचा उल्लेख मोठ्या आदराने करुन काही गाथा देखील उधृत केल्या आहेत. यात एकूण ५४६ इतक्या गाथा असून यात श्रावकाचाराचे विस्तृत विवेचन करण्यात आले आहे. ग्रंथाच्या प्रशस्तीमध्ये लेखकाने कुंदकुंद आम्नायामध्ये श्रीनंदि, नयनंदि, नेमिचंद्र व वसुनंदि अशी आचार्य परंपरा दिली आहे. ग्रंथारंभी सम्यग्दर्शनाचे स्वरुप स्पष्ट करुन जीवांचे भेदोपभेद सांगितले आहेत. द्यूत, मद्य, मांस, वेश्या, शिकार, चोरी , परस्त्रीसेवन इत्यादि सात व्यसनांचे वर्णन करुन व्रतप्रतिमेत १२ व्रतांचा उल्लेख केला आहे. दान फलाचे विस्तृत विवेचन केले आहे. पूजेचे स्वरुप सांगितले असून त्यापासून मिळणा-या फळाविषयी कथन केले आहे. वसुनंदीची विशेषता अशी की, रात्रिभोजन त्याग पहिल्या प्रतिमेमध्येच आवश्यक आहे असे सांगून ६व्या प्रतिमेमध्ये त्याऐवजी दिवा ब्रम्हचर्य सांगितले आहे. या ग्रंथातील अनेक गाथा देवसेनाच्या भावसंग्रह ग्रंथाच्या आधारे लिहिल्यासारख्या वाटतात.

**धर्मरत्नप्रकरण-**

या ग्रंथाचे कर्ते शांतिसूरि असून त्यांनीच या ग्रंथावर स्वोपज्ञ वृत्तीची रचना केली आहे. शातीसूरि साधारणपणे १२व्या शतकातील एक विव्दान मानले जातात. या ग्रंथात एकूण १८१ गाथा असून, त्यात श्रावकाला सौम्यता, पापभिरुता, लाजरेपणा, सुदीर्घदर्शीपणा इत्यादि २१ आवश्यक गुणांनी युक्त व्हावयास सांगून भावश्रमणाची लक्षणे व शीलाचे वर्णन केले आहे. प्रस्तुत ग्रंथाचे प्रकाशन जैनग्रंथ प्रकाशक सभा अहमदाबाद (वि.सं.१९५३) येथून  झाले आहे.

**मुनि आचारविषयक संस्कृत ग्रंथ-**

प्राकृत ग्रंथाप्रमाणेच मुनि आचारविषयीची माहिती आपणाला काही संस्कृत साहित्यातून देखील पहावयास मिळते. आ. कुंदकुंदाच्यानंतर उमास्वामी हे प्रमुख व महान आचार्य होऊन गेले. या आचार्यांनीच प्राकृत साहित्यामध्ये जैनधर्मविषयक संस्कृत साहित्य लिहिण्यास सुरुवात केली. त्यांचेच अनुकरण नंतर पूज्यपादादि काही आचार्यानी केलेले दिसते. मुनि आचाराची माहिती देणारा आचार्य

उमास्वातींचा प्रशमरति प्रकरण हा महत्वाचा ग्रंथ असून, त्याशिवाय अमृतचंद्रसूरिकृत पुरुषार्थसिध्द्युपाय , चामुंडराकृत चरित्रसार, वीरनंदिकृत आचारसार हे ग्रंथ महत्वाचे आहेत. त्यां**ची माहिती खालीलप्रमाणे आहेत.**

**१.प्रशमरति प्रकरण-**

प्रस्तुत ग्रंथ महान आचार्य उमास्वाति यांनी लिहिला असून, तो ३१३ संस्कृत पद्यांनी बध्द आहे. या ग्रंथामध्ये जैन दर्शनाविषयक अनेक गोष्टींचे विवेचन केले आहे. जैन तत्वज्ञान, कर्मसिध्दांत, साधु व श्रावक यांचा आचार, १२ भावना, उत्तम क्षमादिक दशधर्म, धर्मध्यान, केवलज्ञान यांचे वर्णन करुन अयोगी व सिध्द यांचे स्वरुप कथन केले आहे. महान टीकाकार हरिभद्रसूरीने विषयानुसार या ग्रंथाचे एकूण २२ विभाग केले आहेत. या ग्रंथावरील सटीक हिंदी अनुवादाचे प्रकाशन मुंबई येथून १९५० मध्ये झ ाले आहे.

**२.पुरुषार्थसिध्द्युपाय-**

अमृतचंद्रसूरींनी लिहिलेला पुरुषार्थसिध्द्युपाय हा एक आचारविषयक अति महत्वाचा असा ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाचा रचनाकाल साधारणपणे विक्रम संवत १०५५ इतका मानला जातो. पुरुषार्थसिध्द्युपाय या ग्रंथाला उपासक श्रावकांची आचारसंहिता असे म्हटले असून काही ठिकाणी जिन-प्रवचन रहस्य या नावानेही संबोधिले आहे. सद्‌विवेकाव्दारे अमृतस्वरुप आचारसाराचा रसास्वाद घेणे हाच अंतरात्म्याचा श्रेष्ठ पुरुषार्थ असल्याचे सांगितला आहे.

या ग्रंथातील २२६ संस्कृत श्लोक असून त्यातूनच रत्नत्रयाचे विवेचन करण्यात आले आहे. या श्लोकातून क्रमाने चारित्रविषयक अहिंसादि पाच व्रते, सात शील, सल्लेखना आणि सम्यक्त्व त्याचप्रमाणे सम्यक्त्व सल्लेखनेसह १४ व्रत-शीलादिकांचे ७० अतिचार व त्यांचे स्वरुप सांगितले आहे. तसेच १२ तप, ६ आवश्यके, तीन दंड, पाच समिती,दहा धर्म, १२ भावना व २२ परिषह इत्यादि बाबींचे विवेचन केले आहे. हिंसा व अहिंसा यांच्या स्वरुपाचे आणखी सूक्ष्म वर्णन क रुन घेणे म्हणजेच अर्थसिध्दि होय असे कथन केले आहे. प्रामुख्याने पुरुषार्थ सिध्दीचा उपाय कोणता या मूल गोष्टींचे विवेचन करण्याचा प्रयत्न या ग्रंथातून केला आहे. ह्या ग्रंथाची शैली सुरुवातीपासून शेवटपर्यंत विशद व विवेचनात्मक आहे. ही शैली सरळ, सुंदर व प्रासाद गुणांनी युक्त आहे.

**चरित्र-सार-**

मुनि आचारविषयी माहिती देणारा हा एक संस्कृत ग्रंथ असून, या ग्रंथाला भावनासारसंग्रह असेही म्हटले आहे. या ग्रंथामध्ये जैन धर्माचे कर्मसिध्दांत, साधू व श्रावकांचा आचार, बारा भावना, उत्तम क्षमादिक दशधर्म, धर्मध्यान, केवलज्ञान, अयोगी व सिध्द स्वरुप या विविध विषयांचे स्पष्टीकरण केले आहे. या ग्रंथाच्या पुष्पिकेमध्ये अजितसेन भट्टरकाच्या चरणप्रसादाने चार अनुयोगरुपी समुद्रपारगामी

धर्मविजय चामुंडरायाने हा ग्रंथ लिहिला असावा असा उल्लेख आहे. या ग्रंथात रणरंगसिंह याने तत्वार्थ सिध्दांत, महापुराण व आचारशास्त्र यात विस्तारपूर्वक निरुपण केलेल्या चारित्र्याचा सार येथे संक्षेपाने दिला आहे. या उल्लेखावरुन हा ग्रंथ श्रवणबेळगोळ येथे गोमटेश्वर मूर्तीची स्थापना करणारा व ज्याच्यासाठी नेमिचंद्रानी गोम्मटसार लिहिले तो चामुंडराय असावा. यावरुन या ग्रंथाची रचना ११व्या शतकात झाली असावी.

**आचारसार-**

हा ग्रंथ वीरनंदी यांनी लिहिला असून, तो वट्टेकरच्या प्राकृत मूलाचाराच्या आधारे लिहिण्यात आला आहे. यात जवळजवळ १००० इतके संस्कृत श्लोक आहेत. वीरनंदीने आपल्या गुरुचे नाव मेघचंद्र असे सांगितले आहे. श्रवणबेळगोळ येथील ५०व्या शिलालेखामध्ये यांचा उल्लेख मिळतो. शिलालेखातून वीरनंदीला सिध्दांतवेदी, लोकप्रसिध्द, योगि-जनाग्रणी व अमलचरित या पदव्यांनी विभूषित केले आहे. या ग्रंथात अनुक्रमे मुनींच्या उत्तर गुणांचे वर्णन केले असून, त्यात मूलगूण, सामाचार, दर्शनाचार, ज्ञानाचार, चारित्राचार, तपाचार, वीर्याचार, शुध्द्यष्ट, षडावश्यक, ध्यान, जीवकर्म व दशधर्मशील असे बारा अधिकार आहेत.

सिंदूरप्रकार व शृंगार-वैराग्य-तरंगिणी-

हे दोन ग्रंथ नीतीउपदेशात्मक आहेत. दुसरा ग्रंथ प्रोढात्मक आहे. त्यात कामवासनेपासून कसे अलिप्त रहावे याची माहिती दिली आहे.

**षट्खंडागम-**

दिगंबर मान्यतेनुसार मूल आगमग्रंथ कालप्रवाहात हळू हळू नष्ट होत गेले. त्यातील काही ज्ञान मुनिप्रणालीमध्ये काही अंशाने राहिले. कारण श्रुतकेवली भद्रबाहु स्वामीनंतर श्रुतकेवली कोणीच झाले नाही. त्यामुळे १४ पूर्वापैकी ४ पूर्वाचे ज्ञान त्यांच्याबरोबर लुप्त झाले. त्यानंतर ११ आचार्य ११ अंगाचे व १० पूर्वाचे ज्ञाते झाले. पुढे ५ आचार्य फक्त ११ अंगाचे ज्ञाते झाले व नंतर पूर्वाचे ज्ञान जवळ जवळ नष्ट झाले. चार आचार्य तेवढेच आचारांगाने ज्ञाते झाले. याप्रमाणे अंगज्ञानही हळू हळू नष्ट पावू लागले. वीरनिर्वाणानंतर अशी जवळ जवळ ६८३ वर्षे निघून गेली. अंग व पूर्वाचे शिल्लक राहिलेले ज्ञानही नष्ट पावण्याची वेळ आली, तेव्हा धरसेन आचार्यानी महिला नगरीतील यतिसंघाला पत्र पाठवून अत्यंत विनयशील, शीलवान व सर्व कलेत पारंगत असणाऱ्या आ. पुष्पदंत व भूतबली यांना गिरनार येथे बोलावून घेतले. धरसेनांनी त्या दोघांची परीक्षा घेतली व पुढे त्यांना आपले शिष्य बनवून त्यांच्याकडून श्रुताभ्यास करविला. हा श्रुताभ्यास आषाढ शुक्ल एकादशीला समाप्त झाला. आ. पुष्पदंत भूतबलि रचित जी सूत्ररुप रचना करण्यात आली त्यालाच षट्खंडागम असे म्हणतात.

याला खंडसिध्दांत अथवा षट्खंडसिध्दांत या नावाने देखील संबोधिले जाते. याचा रचनाकाल वि.सं. प्रथम शतक मानला जातो.

षट्खंडागम द्रव्यानुयोगातील एक अत्यंत महत्वाचा ग्रंथ समजला जाते. त्याला कर्मग्रंथ असेही म्हणतात. हा ग्रंथ एकूण सहा विभागात विभागला आहे- १. जीवस्थान २. खुद्दाबंध ३. बंधस्वामित्वविचय ४. वेदन ५. वर्गणा ६. महाबंध. जीवस्थान खंडातर्गत सत्प्ररुपणेची रचना आ. पुष्पदंत यांनी १७७ सूत्रात केली असून बाकी ग्रंथाची रचना आचार्य भूतबली यांनी एकूण ६००० सूत्रात केली आहे. जन्म-मरणाच्या फे-यात भ्रमण करीत असणारा संसारी प्राणी, कधी देव होतो तर कधी नारकी, कधी मनुष्य होतो तर कधी तिर्यंच, कधी ज्ञानी तर कधी अज्ञानी, कधी सुखी तर कधी दु:खी, कधी स्वरुपवान तर कधी कुरुप.या संसारी प्राण्याला सुख अल्प मिळते् तर दु:ख फार असते. याविषयी विचार करता असे दिसून येते की, प्राण्याला त्याच्या कर्मानुसार बरे वाईट फळ भोगवे लागते. शुभ अथवा अशुभ कर्मानुसार त्याला बंध होत असतो. ज्याप्रमाणे आंबा पिकल्यावर खाणा-याला तो गोड अथवा आंबट लागतो, त्याप्रमाणे कर्म देखील जीवाला शुभ अशुभ फळ देत असते. जीव स्वतः कर्माचा कर्ता व भोक्ता असतो. जीवाला तपाचरणाने कर्मबंध रोखता येतो, आत्मअभिलाषी भव्य जीव शरीर आणि आत्मा यांचा अनुभव घेऊन दुस-यांदा विषयी राग अथवा व्देष धारण करीत नाही व उत्तम पदाची प्राप्ती कसा करुन घेतो इत्यादिविषयी माहिती षटखंडागम या ग्रंथात दिली आहे.

षट्खंडागम ग्रंथातील सहा खंडाची माहिती खालीलप्रमाणे आहे-

१. जीवट्ठाण- षट्खंडातील हा प्रथम खंड आहे. यात १.सत् २.संख्या, ३. क्षेत्र, ४. स्पर्शन. ५. काल, ६. अंतर, ७.भाव व ८. अल्पबहुत्व हे आठ अनुयोगव्दार असून १. प्रकृती २. समुत्कीर्तना, ३-५. तीन महादण्डक, ६. जघन्य स्थिती, ७. उत्कृष्ठ स्थिती, ८. सम्यक्त्वोत्पत्ति आणि ९. गति-अगति. या नऊ चूलिका आहेत. श्रवलाकराने या खंडाचा विस्तार १८ हजार पद इतका सांगितला आहे. आठ अनुयोगाव्दार व नऊ चूलिकाव्दारे गुणस्थान व मार्गणाविषयी विस्तृत विवेचन केले आहे. जीवस्थान अंतर्गत सत्प्ररुपणामध्ये १७७ सूत्र आहेत. प्रथम सूत्रात पंचपरमेष्ठींना नमस्कार करुन मार्गणांचे प्रयोजन सांगितले आहे. त्यानंतर आठ अनुयोगव्दारा प्रथम सत्प्रुरुपणेच्या विवेचनाला प्रारंभ होतो व नंतर मार्गणांचे विवेचन येते. टीकाकार वीरसेनाने दक्षिण पथवासी आचार्यांना पत्र पाठवून मूनींना बोलावून घेतल्याविषयीचे वर्णन येथे केले आहे.

मोह व योग यांचा उदय, उपशम, क्षयोशपम आणि क्षय यांच्या साह्याने जीवाला जी स्थिती प्राप्त होते त्याला गुणस्थान असे म्हणतात. गुणस्थानाचे एकूण १४ प्रकार सांगितले आहेत. तसेच ज्या अवस्था विशेषतांच्या व्दारे जीवांच्या शोध घेतला जातो त्याला मार्गणा म्हणतात. त्या चौदा आहेत - गति, इंद्रिय, काय, योग, वेद,कषाय, ज्ञान, संयम, दर्शन, लेष्या, भव्यत्व, सम्यकत्व, संज्ञी, आहार. प्रथमतः जीवस्थानामध्ये जीवस्थानामध्ये कोणता जीव कोणत्या गुणस्थानामध्ये आहे, अथवा कोणत्या

जीवांची किती गुणस्थाने संभवतात, गुणस्थानवर्ती जीवांची संख्या किती आहे, ते कोठे राहतात, कुठपर्यंत भ्रमण करतात कोणत्या गुणस्थानाचा किती काळ आहे, एका गुणस्थानाला सोडून पुनः त्या गुणस्थानाची प्राप्ती करुन घेण्यासाठी किती काळ लागतो, कोणत्या गुणस्थानामध्ये औदयिक इत्यादि किती भाव होऊ शकतात, तसेच विवक्षित गुणस्थानवर्ती जीव कोणत्या गुणस्थानवर्ती जीवाहून भारी अथवा हलका असतो, या सर्व गोष्टींचा विचार प्रथम गुणस्थानाच्या आधाराने केला आहे. त्यानंतर या सर्व बाबींचा विचार पुनः गति व इंद्रिय इत्यादि १४ मार्गणांच्याव्दारे देखील केला आहे. शेवटी अनेक प्रकारच्या कर्मप्रकृतींचा निर्देश करुन त्यांच्या निरनिराळ्या स्थिती आणि उदयामध्ये येणाऱ्या योग्य कालाची चर्चा करुन, कोणत्या पर्यायात किती कोणते गुण प्राप्त होतात, अथवा आयुष्य संपताच पूर्व शरीराला सोडून कोणता जीव कोठे उत्पन्न होतो याचे विवेचन केले आहे. याच प्रसंगी कोणता जीव कोणत्या प्रकारे सम्यग्दर्शन आणि चारित्राला प्राप्त करु शकतो याचीही चर्चा येथे केली आहे. हा खंड शिताबराय लक्ष्मीचंद जैन, साहित्योध्दारक फंड अमरावतीहून प्रारंभीच्या ६ विभागाव्दारे प्रकाशित झाला आहे.

२. **क्षुद्रकबंध-** हा षट्खंडातील दुसरा खंड असून त्यामध्ये बंधकजीवांची चर्चा केली आहे. यामुळेच याला क्षुद्रकबंध असे म्हटले आहे. या खंडात ११ मुख्य तथा प्रास्ताविक व चूलिका या प्रकारे सर्व मिळून १३ अधिकार असून एकूण १५८६ इतकी सूत्रे आहेत. पूर्व जीवस्थान खंडामध्ये जीवांचे जे विवेचन गुणस्थान आणि मार्गणाव्दारे केले आहे ते काही विशेषतांच्यासह गुणस्थान निरपेक्ष केवल मार्गणांच्याव्दारे ११ अनुयोगामध्ये केले आहे. ते ११ अनुयोग पुढीलप्रमाणे आहे- १. एक जीवाच्या अपेक्षेने स्वामित्व २. एक जीवाच्या अपेक्षेने काल ३. एक जीवाच्या अपेक्षेने अंतर ४. नाना जीवांच्या अपेक्षेने भंगविचय ५.द्रव्यप्रमाणानुगम ६. क्षेत्रानुगम, ७. स्पर्शानानुगम ८. नानाविध जीवांच्या अपेक्षेने काल ९. नाना जीवांच्या अपेक्षेने अंतर १०. भागाभणानुगम, ११. अल्पबहुत्वानुगम. या अनुयोगापूर्वी प्रास्ताविक रुपात बंधांच्या सत्वस्वरुपाचे विवेचन करुन शेवटी रुपामध्ये महादंडक दिला आहे. दृष्टिवादातील चतुर्थ भेद पूर्वांतर्गत अग्रायणी पूर्व पंचम वस्तु चयनलब्धीच्या सहाव्या पाहुडबंधाच्या बंधक नावाच्या अधिकारापासून या खंडाचा उध्दार करण्यात आला आहे.

**३.बंधस्वामित्वविचय-** याचा अर्थ बंधाच्या स्वामित्वाचा विचार होय. कोणता कर्मबंध कोणत्या गुणस्थानात अथवा मार्गणामध्ये संभवतो याचे येथे विवेचन केले आहे. या खंडात ३२४ सूत्रे आहेत. पहिल्या ४२ सूत्रामध्ये केवळ गुणस्थानानुसार विवेचन केले आहे. बाकीच्या सूत्रात मार्गणानुसार गुणस्थानांचे विवेचन केले आहे. त्यासाठी प्रश्नोत्तररुप शैलीचा वापर देखील केलेला दिसतो.

**४. वेदनाखंड-** या खंडाला प्रारंभ करताना प्रथमत "णमो जिणाणं, णमो ओहिजिणाणं" इत्यादि ४४

सूत्रांच्याव्दारें मंगलाचरण म्हटले आहे. यात कृ ति आणि वेदना अनुयोगव्दारांचे स्पष्टीकरण केले आहे. वेदना अधिकार अधिक प्रतिपादला असल्यामुळे या संपुर्ण खंडाला वेदनाखंड असे नाव देण्यात आले आहे. ४४ सूत्रांच्याव्दारे जे मंगलाचरण धरसेनाचार्यांच्या जोणिपाहुडमधील गणधरवलयमंत्र रुपामध्ये मिळते. या सूत्रामध्ये जिन, अविधिजिन, परमावधिजिन. विपुलमतिजिन, दशपूर्वीजिन, चारण, विद्याधर, आकाशगामी,दीप्ततप, उग्रतप, महातप, घोरतप, मनोबली, वचनबली, कायबली, सर्वसिध्दायतन आणि वर्धमान बुध्द ऋषी यांना नमस्कार केला आहे. पुढील १६ अधिकाराव्दारे वेदनेचे वर्णन करण्यात आले आहे- १. निक्षेप २.नय ३. नाम, ४. द्रव्य, ५. क्षेत्र, ६. काल, ७. भाव, ८. प्रत्यय, ९. स्वामित्व, १०.वेदना, ११. गति, १२. अनन्तर, १३. सन्निकर्ष, १४. परिणाम, १५. भागानुभाग , १६. अल्पबहुत्वानुगम या खंडाचा विस्तार १६ हजार पद इतका सांगितला आहे.

**५. वर्गणाखंड-** पाचव्या खंडाचे नाव वर्गणाखंड असून त्यात स्पर्श, कर्म व प्रकृति नामक तीन अनुयोगाव्दारांचे,स्पष्टीकरण केले आहे. स्पर्श अनुयोगव्दारात स्पर्शनिक्षेप, स्पर्शनयविभाषता, स्पर्शनामविधान, स्पर्शद्रव्यविधान या १६ अधिकाराव्दारे स्पर्शविषयक विचार केला आहे. कर्म अनुयोगाव्दारे नामकर्म, स्थापनाकर्म, द्रव्यकर्म, प्रयोगकर्म, समवदानकर्म अधःकर्म, ईर्यापथकर्म, तपःकर्म, क्रियाकर्म आणि भावकर्म याचे विवेचन आहे. प्रकृतिअनुयोगव्दारामध्ये प्रकृतिनिक्षेप इत्यादि १६ अनुयोगाव्दारात भाषाविषयक उल्लेख करीत असताना करि, पारसीक, सिंघल, बर्बरीक इत्यादि देशवासींच्या भाषेला कुभाषा म्हटले आहे. शिवाय तीन कुरु, तीन लाड, तीन महाराष्ट्र, तीन मालव, तीन गौड, तीन तीन मगध देशांच्या भाषांचे भेदानुरुप १८ प्रकार सांगितले आहेत. श्रुतज्ञानाचे स्वरुप कथन करित असताना, व्दादशा्ंग वाणीच्या मुख्यतेने त्याचे संख्यात भेद केले आहेत. पुनः अवधि, मनःपर्याय व केवलज्ञानाचे स्वरुप सांगितले आहे.

कर्मसंबंधित बंध, बंधक, बंधनीय आणि बंधविधान या चार अवस्था सांगितल्या आहेत आहेत. द्रव्याचे द्रव्याबरोबर अथवा द्रव्य भावाचा जो संयोग वा समवाय होतो त्यालाच बंध असे म्हणतात. हा बंध ज्या जीवाच्याकडून केला जातो त्याला बंधक असे म्हणतात. बंधाला योग्य जे पुद्गल द्रव्य आहे त्याला बंधनीय असे म्हणतात व बंधभेदांना बंधविधान असे म्हणतात. ते प्रकृति, स्थिती, अनुभाग आणि प्रदेश या चार प्रकारचे आहे. या ठिकाणी बंध, बंधक आणि बंधनीय या तिन्हींची चर्चा केली आहे. याशिवाय बंधविधानाचे विस्तृत विवेचन महाबंध नावाच्या सहाव्या खंडात केले आहे.

**६. महाबंध-** षट्खंडागमातील हा शेवटचा खंड आहे. याला महाधवल नावाने देखील संबोधिले जाते. याची रचना आचार्य भूतबलीने केली आहे. याचे मंगलाचरण वेगळे नसून षट्खंडागमातील चौथ्या खंडातील मंगलाचरणाशी याचा संबंध आहे.तरी देखील ही महान कृति एक स्वतंत्र कृति समजण्यासारखी आहे. कारण ही कृति पहिल्या पाच खंडापेक्षा विशाल आहे. दुसरे असे की, या खंडावर टीका लिहिण्याची गरज नसल्याचे सांगितले आहे. या खंडाचा विस्तार ४० हजार श्लोक इतका आहे.

महाबंधाचे विभाजन सात भागात केले आहे. प्रथम विभागामध्ये प्रकृतिबंध नामक प्रथम अधिकाराचे वर्णन सर्वबंध, नोसर्वबंध उत्कृष्टबंध, अनुत्कृष्टबंध यात केले आहे. दुस-या विभागात स्थितीबंध अधिकाराचे वर्णन केले आहे. याचे मूलप्रकृतिस्थितिबंध व उत्तरप्रकृतिस्थितिबंध असे दोन प्रमुख अधिकार आहेत. मूलप्रकृतिस्थितिबंधाचे पुनः चार अधिकार आहेत- स्थितिबंधस्थानप्ररुपणा, निषेकप्ररुपणा, आबाधकांडप्ररुपणा आणि अल्पबहुत्व. पुढे अध्दाच्छेद, सर्वबंध, नोसर्वबंध, उत्कृष्टबंध इत्यादि अधिकाराव्दारे मूलप्रकृतिस्थितिबंधाचा विचार केला आहे. उत्तरप्रकृतिस्थितिबंधाचा विचार देखील अशाच प्रकारे केला आहे. तिस-या विभागात स्थितिबंधाच्या शेष भागाचे वर्णन चालू आहे. बंधसन्निकर्ष, नाना जीवांच्या अपेक्षेने भंगविचय, भागाभागप्ररुपणा, परिणामप्ररुपणा, क्षेत्रप्ररुपणा, कालप्ररुपणा, अंतरप्ररुपणा, भावप्ररुपणा आणि अल्पबहुत्व नामक अधिकाराव्दारे विषयाचे विवेचन केले आहे. चौथ्या भागात  अनुभागबंध अधिकाराचे विवेचन केले आहे. मूलप्रकृतिअनुभागबंध आणि उत्तरप्रकृतिअनुभागबंध अपेक्षेने तो २ प्रकारचा आहे. याचे निषेकप्ररुपणा, स्पर्धकप्ररुपणा इत्यादि अधिकाराव्दारे स्पष्टीकरण केले आहे. पाचव्या भागामध्ये अनुभागबंध अधिकाराच्या शेष भागाची माहिती दिली आहे. सन्निकर्ष, भंगविचय, भागाभाग, परिणाम, क्षेत्र, स्पर्शन व्दारा याचे विवेचन केले आहे. सहाव्या भागात प्रदेशबंध अधिकाराच वर्णन आहे. यात प्रत्येक समयात बंध प्राप्त करणारे मूल व उत्तर कर्मप्रदेशाच्या आश्रयानेमूलप्रकृतिप्रदेशबंध व उत्तरप्रकृतिप्रदेशबंध याचा विचार केला आहे, अनेक अनुयोगाव्दारे याचे स्पष्टीकरण   केले आहे. महाबंधाच्या सातव्या भागात प्रदेशबंधाच्या शेष भागाचा विचार केला आहे. यात क्षेत्रप्ररुपणा,  स्पर्शनप्ररुपणा, कालप्ररुपणा,अंतरप्ररुपणा, भावप्ररुपणा, अल्पबहुत्वप्ररुपणा, स्वामित्व, वृध्दिबंध, अध्यावसान, समुदाहार व जीवसमुदाहार नामक अधिकाराव्दारे विषयाचे विवेचन केले आहे. येथे सहा खंडांनी युक्त षट्खंडागमाची समाप्ति होते.

**षट्खंडागमावरील टीका-**

दिगंबर मान्यतेनुसार षट्खंडागम हा द्रव्यानुयोगातील एक अत्यंत महत्वाचा ग्रंथ समजला जातो. अशा महत्वपूर्ण ग्रंथावर वेळोवेळी अनेक टीका लिहील्या गेल्या आहेत. यात कुंदकुंदाचार्यकृत परिकर्म, शामकुंडकृत पध्दति, तुम्बुलूराचार्यकृत चूडामणी, समंतभद्रस्वामीकृत टीका आणि बप्पदेवगुरुकृत व्याख्याप्रज्ञाप्ति इत्यादि टीका प्रसिध्द आहेत. या टीकाकारांचा काळ अनुक्रमे इ.स. दुसरे, तिसरे, चौथे, पाचवे व सहावे शतक इतका मानला जातो. दुर्भाग्य असे की, या सर्व टीका उपलब्ध नाहीत.

षट्खंडागमावर सर्वात महत्वाची ‘धवला’  नावाची टीका आहे. या टीकेचे कर्ते वीरसेन आहेत. त्यांच्या गुरुंचे नाव आर्यनंदी आहे. आदिपुराणकर्ते सुप्रसिध्द जिनसेन आचार्य यांचे शिष्य होते.

जिनसेनांनी आपल्या गुरुंच्या सर्वार्थगामिनी नैसर्गिक ज्ञानाची पुष्कळ प्रशंसा केली आहे. वीरसेनांनी बप्पदेवगुरुच्या व्याख्याप्रज्ञाप्ति टीकेच्या आधारे चूर्णि प्रकारची प्राकृत संस्कृत मिश्रित ७२ हजार श्लोकप्रमाण असलेली धवला नावाची टीका लिहिली.

धवला टीकाकाराच्या प्रशस्तीनुसार सन ८१६ मध्ये लिहिली असून ती वाटग्रामपुरामध्ये लिहून समाप्त केली होती. धवला टीकाकर्ते वीरसेन महाविव्दान होते. त्यांनी दिगंबर व श्वेतांबर आचार्याच्या विशाल साहित्याचे अवलोकन केले होते. वीरसेनांच्या टीकेत सत्कर्मप्राभृत, कषायप्राभृत, सन्मतिसूत्र, त्रिलोकप्रज्ञप्तिसूत्र, पंचात्थिपाहुड, गृध्दपिच्छ आचार्यांचे तत्वार्थसूत्र, आचारांग(मूलाचार), पूज्यपादकृत सारसंग्रह, अकलंक रचित तत्वार्थभाष्य जीवसमास , छेदसूत्र,कर्मप्रवाद व दशकर्णीसंग्रह इत्यादि महत्वपूर्ण सिध्दांत ग्रंथाचा उल्लेख मिळतो. श्वेंतांबर संप्रदायमान्य आचारांग, बृहत्कल्पसूत्रगत 'तालपलंब ' सूत्राचा यात उल्लेख करुन यथाशक्ति त्याचे समाधान केले आहे. नागहस्तीच्या उपदेशाला येथे पव्वाइज्जंत व आर्यमंक्षुच्या उपदेशाला अपवाइज्जमाण म्हटले आहे. याव्दारे या दोन्ही महान आचार्यातील मतभेदांचे सूचन केले आहे. स्वतः पंचस्तूपान्वयाचे असल्याचे सांगून विद्यागुरु एलाचार्य, दीक्षागुरु आर्यनंदी व त्यांचे गुरु चंद्रसेन यांचाही उल्लेख केला आहे. विविध ग्रंथ, त्यांचे कर्ते, गुरु-शिष्य परंपरा व सैध्दांतिक ज्ञानाच्या दृष्टीने धवला टीकेची महति फार मोठी आहे.

### कसायपाहुड(कषायप्राभृत)

षट्खंडागमाप्रमाणेच कषायगमाप्रमाणेच कषायप्राभृत व्दादशांगाचेच एक महत्वपूर्ण अंग मानले जाते. या ग्रंथाचा उध्दार पाचव्या ज्ञानप्रवादपूर्वातील दहाव्या बाबीतील तिस-या पेज्जदोसपाहुड पासून केला आहे. म्हणूनच कषायप्राभृताला 'पेज्जदोसपाहुड' असेही म्हटले जाते. पेज्ज (प्रेयस्) याचा अर्थ राग व दोषाचा अर्थ व्देष असा होते. हे दोन्ही कषायस्वरुपच आहेत. म्हणून उक्त दोन्ही नावे सारख्या अर्थाचे सूचक आहेत. याचा रचनाकाल विक्रम प्रथम शतकाचा पूर्व मानला जातो. या मूल सिध्दांत ग्रंथाची रचना आ. गणधर (ई.५७ते१५६) यांनी केली.

प्रस्तुत ग्रंथात क्रोधादि कषायांची राग-व्देष-परिणति आणि त्यांची प्रकृति, स्थिति, अनुभाग व प्रदेशगत वैशिष्ट्ये इत्यादींचे स्पष्टीकरण केले आहे. कषायप्राभृताची रचना २३३ गाथा सूत्रांच्यामध्ये केली आहे. ही सूत्रे अत्यंत संक्षिप्त आणि गूढार्थाने युक्त आहेत. गुणधर आचार्यानी कषाय प्राभृताची रचना करुन आचार्य नागहस्ती व आर्यमंक्षु यांना त्यांचे  स्पष्टीकरण करविले. त्यांच्याजवळ या ग्रंथाचे अध्ययन करुन आचार्य यतिवृषभांनी जवळपास इ.स. ६व्या शतकात सहा हजार श्लोकप्रमाण असलेल्या चूर्णी-सूत्रांची प्राकृतमध्ये रचना केली. त्यानंतर आचार्य यतिवृषभापासून चूर्णी सूत्रांचे अध्ययन करुन उच्चारणाचार्यांनी त्यावर १२००० श्लोकप्रमाण असलेल्या उच्चारण सूत्रांची विस्तृत

रचना केली. उच्चारणार्यांनी ही टीका मात्र अनुपलब्ध आहे. मूल गाथासूत्र व यतिवृषभांच्याचूर्णी सूत्रावरुन वीरसेनांनी सन ८७४ मध्ये २००० श्लोकप्रमाण जयधवला नावाची अधूरी टीका लिहिली. ती त्यांचे शिष्य व राष्ट्रकूट राजा अमोघवर्षांचे गुरु जिनसेनाचार्यांनी (इ. ८०० ते ८४३) मध्ये ४०,००० श्लोकांनी पूर्ण केली. या ग्रंथावर वरीलप्रमाणे अनेक प्रकारच्या टीका लिहिल्या गेल्या आहेत.

अनुत्तर, विमल, संशयरुपी अंधराला नष्ट करणारे, पुष्कळ प्रकार व गुणांनी युक्त, स्वर्गाची शिढी, मोक्षाचे मुख्य व्दार, निर्मलबुध्दि व सर्वांच्या मुखातून निघालेले, पूर्वापर विरोध दोषाने रहित, विशुध्द, अक्षय आणि अनादि निधन सांगितले आहे. राग व्देषी आणि अज्ञानी मनुष्यापासून उत्पन्न आगमाला आगमाभास म्हणतात.

विविध अंगानी व गुणांनी युक्त असलेल्या या आगम सूत्रांची रचना महावीरांच्यानंतर त्यांच्या गणधरांनी केली. त्यांचा इ.स. ५ वे शतक इतका मानला जातो. या आगमाची रचना त्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीमध्यु मोठ्या परिश्रमाने केली. ही रचना बहुधा अर्धमागधी भाषेत आहे. आगम साहित्य जैन सस्कृति व इतिहास यांचे आधारस्तंभ आहे. या साहित्यात जैन मुनींचे आचार, विचार, विहार, भिक्षाग्रहण, व्रत, नियम, सिध्दांत, परमतखंडन, स्वमत प्रदिपादन इत्यादि विषयांचे विवेचन केले आहे. प्रसंगानुरुप त्यासाठी कथा, चरित्र, उपमा, रुपक दृष्टांत यांचाही वापर केला आहे. धार्मिकदृष्ट्या हे साहित्य अत्यंत महत्वाचे आहे. जैन आगम साहित्य म्हणजे, जैनधर्मरुपी वृक्षाचे जणु मूळ आहे. या आगम ज्ञानाशिवाय जैनधर्माच्या स्वरुपाचे सांगोपांग ज्ञान होऊच शकणार नाही. म्हणूनच आगमसाहित्याला अत्यंत मानाचे आणि महत्वाचे स्थान जैन साहित्यात दिल आहे.

## महावीरपूर्व उपलब्ध साहित्य -

जैन आगम साहित्याला 'श्रुतज्ञान' किंवा 'सिध्दांत' या नावांनी संबोधिले जाते. हे सर्व ज्ञान जैनागमात किंवा जैन सिध्दांतशास्त्रात समावले आहे. आगमाची प्राचीनता तसेच प्रमाणता यांचा विचार करीत असताना श्वेतांवर व दिगंबर या दोन्ही पंथाकडून वेगवेगळ्या परंपरा सांगण्यात आल्या आहेत. अर्थातच जैन आगम साहित्याविषयी दोन्ही संप्रदायामध्ये प्रथम मान्यता असली तरी मतभेद आहेत.

प्रथम तीर्थंकर भगवान ऋषभदेवांनी १४ पूर्वग्रंथ व ११ अंगग्रंथामध्ये आपला सध्दर्म हितोपदेशिला अंतिम २४ वे तीर्थंकर भगवान महावीरांनी आपल्या ११ गणधरांना मूळ सिध्दांताचा उपदेश केला. १४ पूर्वग्रंथ १२ व्या दृष्टिवाद अंगात एकत्रित केले होते. हळूहळू कालदोषानुसार हे पूर्वग्रंथ नष्ट होत गेले. आज

दृष्टिवाद अस्तित्वात नाही. आज जे आगम ग्रंथ अस्तित्वात असल्याचे दिसतात ते भगवान महावीरानंतर रचण्यात आले आहेत. याच ठिकाणी महावीर पूर्वकालीन काही साहित्य उपलब्ध असावे की नसावे असा प्रश्न आपल्यापुढे उभा राहतो.

वरील प्रश्नाचे उत्तर आपणाला होकारात्मक व नकारात्मक दोन्ही प्रकारे द्यावे लागते. कारण साहित्याचे अंतरंग पहात असताना आपणाला त्यामध्ये दोन तत्वमूल्यांचा अंतर्भाव झालेला दिसतो. एक म्हणजे त्याचे शाब्दिक व रचनात्मक स्वरुप आणि दुसरे म्हणजे अर्थात्मक व विचारात्मक स्वरुप. या दोन्ही मूल्यांना जैन परंपरेनुसार द्रव्यश्रुत व भावश्रुत असे म्हणतात. द्रव्यश्रुतरुपाने महावीर पूर्वकालीन साहित्य उपलब्ध नसल्याचे आढळून येते, परंतु भावश्रुताच्या अपेक्षेने जैन श्रुतांगातील काही रचना महावीर पूर्वकालीन श्रमण परंपरेमध्ये प्रचलित होती असे मानले आहे. यामुळे त्या विभागाला 'पूर्वश्रुत' असे म्हणतात. द्वादशांग आगमातील बारावा आगमग्रंथ दृष्टिवाद होय. यामध्ये चौदा पूर्वांचा समावेश आहे. या चौदा पूर्वांमध्ये महावीर पूर्वकालीन अनेक विचारप्रवाह, मतमतांतरे व ज्ञान-विज्ञान यांचे संकलन महावीर शिष्य गौतमाने केले होते. हे ज्ञान हल्ली अस्तित्वात अथवा उपलब्ध नाही. मात्र चौदा पूर्वांची नावे आणि नावावरुन त्यात कथन केलेल्या विषयाची माहिती मात्र आपणाला मिळू शकते.

चौदा पूर्वग्रंथाची नावे पुढीलप्रमाणे आहेत - १) उत्पाद, २) अग्रायणीय, ३) वीर्यानुवाद, ४) अस्तिनास्तिप्रवाद, ५) ज्ञानप्रवाद, ६) सत्यप्रवाद, ७) आत्मप्रवाद, ८) कर्मप्रवाद, ९) प्रत्याख्यान, १०) विद्यानुवाद, ११) कल्याणवाद, १२) प्राणावाय, १३) क्रियाविशाल, १४) लोकबिंदूसार. क्रमशः यात वर्णन केलेले विषय पुढीलप्रमाणे दिसून येतात.

**१. उत्पाद -** हा प्रथम पूर्वग्रंथ मानला जात असून, यामध्ये जीव, काल, पुद्गल इत्यादि द्रव्यांची उत्पत्ति, विनाश व ध्रुवता यासंबंधी विचार केला आहे.

**२. अग्रायणीय -** यामध्ये जीव, काल, पुद्गल यांची माहिती त्यांच्या विविध उवस्थांची संख्या, परिणाम यांचा विचार केला आहे.

**३. वीर्यानुवाद -** या पूर्वात क्षेत्र, काल इत्यादींच्या अपेक्षेने द्रव्यांचे वीर्य अर्थात सामर्थ्य हा विषय सांगितला आहे.

**४. अस्ति-नास्तिप्रवाद -** यात लौकिक वस्तूंच्या अस्तित्व-नास्तित्वाचे विवेचन विविध प्रकारे केले आहे.

**५. ज्ञानप्रवाद -** या पाचव्या पूर्वात मति, श्रुति, अवधि, मनःपर्यय इत्यादि ज्ञानाचे भेद-प्रभेद यासंबंधी प्रतिपादन केले आहे.

**६. सत्यप्रवाद -** यामध्ये वचनाच्या अपेक्षेने सत्यासत्याचे विवरण व वक्त्यांच्या मानसिक परिस्थितीचे आणि त्याप्रमाणे असत्याच्या स्वरुपांचे विवेचन आहे.

**७. आत्मप्रवाद -** या पूर्वात आत्म्याचे स्वरुप, त्याची व्यापकता, ज्ञातृभाव व भोक्तृत्वासंबंधी स्पष्टीकरण केले आहे.

**८. कर्मप्रवाद -** यामध्ये नानाविध प्रकारच्या कर्माची प्रकृति, स्थिति, शान्ति व परिणाम इत्यादींचे विवेचन आहे.

**९. प्रत्याख्यान -** यात परिग्रह-त्याग, उपवासादि विधि, मन-वचन, काय संबंधी विशुध्दि इत्यादि आचार नियमांचा निर्णय आहे.

**१०. विद्यानुवाद -** या दहाव्या पूर्वग्रंथात विविध प्रकारच्या विद्या, उपविद्या यासंबंधी माहिती आहे. शिवाय यामध्ये अंगुष्ठ, प्रसेन इ. ७०० अल्पविद्या, रोहिणी इ. ५०० महाविद्या व अंतरिक्ष, भौम, अंग, स्वर, स्वप्न, लक्षण आणि छिन्न अशा आठ महानिमित्ताने भविष्य जाणण्याच्या विधींचे वर्णन आहे.

**११. कल्याणप्रवाद -** सूर्य, चंद्र, नक्षत्र व तारागण यांच्या नाना प्रकारच्या गतींच्या निरीक्षणावरुन शकुनाचा विचार यात केला आहे. शिवाय बलदेव, वासुदेव, चक्रवर्ती इत्यादि महापुरुषांच्या गर्भावतरण प्रसंगी उत्पन्न होणारी लक्षणे व कल्याणसंबंधीचे कथन आहे. या शकुन व शुभाशुभ लक्षणांच्या निमित्ताने भविष्यकाळी घडणाऱ्या घटनांचे कथन 'अबंध्य' अर्थात अवश्यभावी मानले आहे. अर्थात कल्याणप्रवादाला श्वतांबर परंपरेनुसार 'अबंध्य' या नावाने संबोधिले होते.

**१२. प्राणावाय इ** हा आयुर्वेदविषयक ग्रंथ मानला जात असून, कायचिकित्सा शास्त्राचे प्रतिपादन व शरीर धारणेच्या दृष्टीने प्राण, अपान इत्यादि वायूंच्या कार्याचे प्रतिपादन या पूर्वग्रंथात आहे.

**१३. क्रियाविशाल -** या तेराव्या पूर्वग्रंथामध्ये लेखन, गणित, संगीत, वाद्य इत्यादि बहात्तर कला स्त्रियांचे चौसष्ट गुण व शिल्प यांची माहिती दिली असून ग्रंथ रचनेसंबंधी गुण व छंद इत्यादींचे स्पष्टीकरण यात आहे.

**१४. लोक बिंदुसार -** या चौदाव्या आणि शेवटच्या पूर्व ग्रंथामध्ये श्रेष्ठ क्रिया व व्यवहार आणि त्या निमित्ताने मोक्षप्राप्ती यासंबंधी विचार केला आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, या पूर्वनामक ग्रंथामध्ये केवळ धार्मिक, दार्शनिक, नैतिक विचारांचेच संकलन नसून, तत्कालीन कला, ज्योतिष, आयुर्वेद इत्यादि विज्ञाने व फल-ज्योतिष शकुनशास्त्र, मंत्रतंत्र इत्यादि विषयांचाही समावेश करण्यात आला आहे. या विविध प्रकारच्या संग्रहामुळेच या ग्रंथ संग्रहाना प्राचीन भारतीय ज्ञानकोष असे म्हटले तर अयोग्य ठरणार नाही.

वर उल्लेखिलेले पूर्व-साहित्य दुर्भाग्याने सुरक्षित राहू शकले नाही. तरीसुध्दा नंतरच्या साहित्यामध्ये ठिकठिकाणी यांचा उल्लेख मिळतो. त्यातील विषयांचे वर सांगितल्याप्रमाणे कोठे कोठे विवेचन आढळते. अशाप्रकारे महावीर निर्वाणनंतर १६२ वर्षांनी हे पूर्वग्रंथ हळूहळू नष्ट झाले. वरील सर्व पूर्वांचे ज्ञान असणारे अंतिम श्रुतकेवली भद्रबाहू होते. त्यानंतर १८१ वर्षाच्या कालावधीमध्ये झालेल्या विशाखाचार्यापासून धर्मसेनपर्यंतच्या आचार्यांना १४ पैकी पहिल्या १० पूर्वांचे ज्ञान होते. त्यानंतर पूर्वग्रंथ ज्ञाते कोणीही झाले नाहीत. षट्खंडागमातील वेदना खंडाच्या सुरुवातीला दशपूर्वज्ञाते व चौदा पूर्वज्ञाते असलेल्या मुनींना नमस्कार केला आहे. वीर-निर्वाणानंतर सुमारे ७०० वर्षांनी झालेल्या आचार्य धरसेन यांना दुसऱ्या पूर्वातील काही अधिकरांचे विशेष ज्ञान होते. ते गिरिनार येथील चंद्रगुफेमध्ये रहात असत. त्यांनीच पुढे आचार्य पुष्पदंत व भूतबलि यांच्या साह्याने षट्खंडागमाची सूत्ररुप रचना केली.

## प्राकृत भाषा

### प्राकृत भाषेचा सामान्य परिचय -

प्राचीन भारतीय भाषा आणि आधुनिक भारतीय आर्यभाषा या दोहोंच्या मधील भाषाविषयक ऐतिहासिक भूमिकेला आपण 'प्राकृत' असे म्हणू शकतो. प्राकृत भाषा ही पूर्वकालापासून आर्यांची एक बोली भाषा म्हणून सुध्दा ओळखली जाते. अर्थात् प्राकृत म्हणजे नक्की कोणती भाषा असावी अथवा कोणत्या भाषेला प्राकृत भाषा म्हणावे याविषयी व्याकरणकारात तथा विव्दानांच्यामध्ये मतभेद आहेत. पाश्चात्य विव्दानांनी प्राकृत शब्दाचा वापर पुढीलप्रमाणे केलेला दिसतो - १.प्राकृत म्हणजे त्या विशेष भाषा ज्यांचा

भारत वर्षात प्राकृत शब्दाने उल्लेख केला आहे. उदा- महाराष्ट्री अथवा संस्कृत नाटकातील प्राकृत भाग. २. प्राकृत म्हणजे भारतीय मध्ययुगाची भाषा. ३. साहित्यिक आणि शिष्ट भाषापासून भिन्न लोकभाषा. या शेवटच्या मतावरुन काही लेखक प्राकृतचे तीन विभाग पाडतात. १. प्रथम, २. व्दितीय, ३. तृतीय प्राकृत. या तिन्ही उल्लेखावरुन एक महत्वाची बाब स्पष्ट होते ती अशी की, प्राकृत ही लोकभाषा असो अथवा साहित्यिक भाषा असो ती भारतीय भाषा साहित्याची एक आवश्यक बाब ठरली होती. प्राचीनतम वेदभाषा आणि वर्तमान नवीन आर्यभाषा या दोहोंच्यामधील भाषा इतिहासाच्या अवस्थे्लाच आपण प्राकृत म्हणू. भारतीय आर्यभाषेचे विभाजन प्राचीन, मध्ययुगीन व आर्वाचीन अशा तीन भागात करता येते. यातील मध्ययुगाचे प्रतिनिधित्व प्राकृत भाषेला देण्यात येते. '

इ.स. पूर्व ६०० ते इ.स. १००० पर्यंत भारतीय आर्यभाषा विविध प्राकृत तथा त्यानंतर अपभ्रंश स्वरुपात राहून पुढे तीच प्राकृत आधिुनिक भारतीय आर्यभाषांची जननी झाली. या १६०० वर्षाचा काल आपणाला खालील तीन पर्वात विभाजित करता येईल.

१. प्रथम पर्व यात २०० इ. सनापूर्वीचे प्रारंभिक परिवर्तन व २०० इ. सनापूर्वीपासून २०० इ.स. पर्यंतचा समावेश होईल.

२. २०० इ. सनापासून ६०० इ. सनापर्यंतचे व्दितीय पर्व.

३. ६०० इ. सनापासून १००० वर्षापर्यंतचे तृतीय पर्व.

प्रथम पर्वामध्ये पाली आणि अशोकाचे शिलालेख यांचा समावेश होतो. पालीला आजकाल प्राचीन प्राकृत मानले असून, प्राकृतपासून भिन्न मानले आहे. प्राकृत व्याकरणकारांनी प्राकृतचे व्याकरण सांगत असताना पालीचा विचार केलेला दिसत नाही. व्दितीय पर्वात साहित्यिक प्राकृतचा समावेश करण्यात आला असून, तृतीय पर्वात अपभ्रंश भाषेचा विकास झाल्याचे मानले जाते. प्राकृत साहित्याचा हा अंतिम काल होय.

**प्राकृतची उत्पति -**

प्राकृत व्याकरणकारांनी प्राकृत शब्दाची उत्पत्ति 'प्रकृति' शब्दाचा अर्थ 'संस्कृत' असे मानून, प्राकृत भाषेची उत्पत्ति संस्कृतपासून झाल्याचे मानले आहे. संस्कृतच्या काही अलंकार-शास्त्राच्या टीकाकर्त्यांनी तद्भव आणि तत्सम शब्दात स्थित असणाऱ्या 'तत्' शब्दाचा संबंध संस्कृतशी लावून याच मताचे अनुकरण केले आहे. याविषयीची व्याकरणकारांची मते खालीलप्रमाणे दिसून येतात.

१. प्रकृतिः संस्कृतं तत्र भवं तत आगतं वा प्राकृतम् । ( हेमचंद्र 'प्रा. व्या. ')

२. प्रकृतिः संस्कृतं तत्र भवं प्राकृतमुच्यते । ( मार्कण्डेय 'प्राकृत सर्वस्वम्')

३. प्रकृतिः संस्कृतम् तत्र भवत्वात् प्राकृतम् स्मृतम् । ( प्राकृत चंद्रिका )

४. प्रकृतेः संस्कृतप्पास्तु विकृतिः प्रकृति मता । ( षडभाष चंद्रिका )

५. प्राकृतस्य तु सर्वमेव संस्कृतं योनिः । ( प्राकृत संजीवनी )

६. प्रकृतेर् आगतं प्राकृतम् । प्रकृतिः संस्कृतम् । ( दशरुपक टीका )

या विविध व्याकरणकारांच्या मतानुसार प्राकृतही संस्कृतपासून उत्पन्न झाल्याचे सांगितले आहे. अर्थात् साहित्यात सुरक्षित असलेल्या प्राकृतचे जे रुप पाहावयास मिळते, यावरुन प्राकृत ही संस्कृतची कन्या असल्याप्रमाणे वाटते. प्राकृतमधील ९५% शब्द संस्कृतशी मिळते जुळते आहेत. हिचा धातुकोश तर पूर्णतः संस्कृतवत् असून व्याकरण देखील संस्कृतसारखे आहे. अपभ्रंशादि भाषामध्ये ज्याप्रमाणे संस्कृतपासून स्वतंत्रपणे विभिन्नता आढळते त्याप्रमाणे प्राकृतमध्ये आढळत नाही. साहित्यिक प्राकृत तर संस्कृतची सेविका असल्याप्रमाणे वाटते. म्हणूनच प्राकृतमध्ये तद्‌भव शब्द जास्त असून देशी शब्दांची कमतरता आहे.

परंतु भाषाशास्त्राच्या दृष्टीने वरील मत सुसंगत वाटत नाही. हे मत अप्रामाणिक आणि विरुध्द वाटते. कारण 'प्राकृत' या शब्दाचा अर्थ जो 'संस्कृत' असा केला आहे, तो अर्थ संस्कृतच्या कोणत्याही कोशामध्ये सापडू शकत नाही. आणि जोपर्यंत प्राकृतचा अर्थ संस्कृत असा मिळू शकत नाही तोपर्यंत वरील मत ग्राह्य धरणे उचित ठरणार नाही. एवढेच नव्हे तर संस्कृत - प्राकृतमध्ये कार्य - भाव मुळीच दिसत नाही.

या उलट प्राकृत हा शब्द 'प्रकृति' या शब्दापासून तयार झाला आहे. 'प्रकृति' याचा अर्थ नैसर्गिक, स्वाभाविक असाही होतो. काही विव्दानांनी 'प्रकृति' शब्दाचा अर्थ मूळ धर्म, मूळ स्थिति, मूळ स्वभाव, मूळ स्वरुप तथा मूळ कारण असा सांगितला आहे. या शिवाय 'प्रकृति' शब्दाचा 'जनसाधारण' असाही एक अर्थ घेतला आहे. म्हणूनच हरिगोविंददास शेठ यांनी 'प्राकृत्या स्वभावेन सिध्दं प्राकृतम्' अथवा 'प्रकृतीनां

साधारणजनानाम् इदं प्राकृतम्' असा प्राकृतचा अर्थ केला आहे. काव्यालंकार टीकाकार नमिसाधूने देखील म्हटले आहे -

'प्राकृतेति । सकलजगज्जन्तूनां व्याकरणादिभिनाहितसंस्कारः सहजी वचन व्यापारः प्रकृतिः तत्र भवः सेव वा प्राकृतम् ।'

वरील मतावरुन स्पष्ट होते की प्राकृत म्हणजे स्वभावसिध्द बोली भाषा असून तिच्यावर संस्कृतीचा संस्क्ार तथा व्याकरणाचे नियंत्रण झालेले नसते. प्राकृतचा एक अर्थ 'प्रजा' असा करुन प्राकृत म्हणजे प्रजेची भाषा असेही म्हटले आहे. या उलट संस्कृत भाषा देवांची, पंडिताची, सुसंस्कृत लोकांची व व्याकरणाने शुध्द असलेली भाषा मानली जात असून तिचा वापर राजदरबार, यज्ञशाळा या ठिकाणी केला जात असे. थोडक्यात आतापर्यंतच्या विवेचनावरुन प्राकृत ही संस्कृतपासून उत्पन्न झाली असावी असा एक मत-प्रवाह दिसतो तर, दुसऱ्या मतप्रवाहानुसार प्राकृत ही सर्वसाधारण जनांची भाषा होय असे दिसते.

संस्कृतपासून प्राकृतची उत्पत्ती झाली असावी या प्रथम मतप्रवाहाचे खंडन आपणाला आणखी एक प्रकारे करता येते ते असे की इतिहास आणि भाषाशास्त्रानुसार कोणत्याही साहित्यिक भाषेचा विकास हा जनभाषेपासून होत असतो. परंतु जेव्हा जनभाषा लिहिली जाऊ लागते तेव्हा ती हळूहळू स्थिर होते जाते. ती संस्कृति, शासन, धर्म, ज्ञान, विज्ञान आणि कला यांचे वाहक बनण्यासाठी कोणत्या ना कोणत्या साहित्यिक भाषेचा आधार घेत असते. तिचे शब्दभांडार उच्च व समृध्द होऊन व्याकरणगतरुप व्यवस्थित होते. परंतु पुनः तत्कालीन बोली भाषा व्याकरण नियमांची पर्वा न करता पुढे जाते. तिच्यात काही परिवर्तन, मिश्रण आणि विकार संभवतात व त्याच भाषेचे साहित्यिक रुप जनसाधारण लोकांना समजण्यास कठिण होते. जेव्हा साहित्यिक भाषेचा प्रभाव शिक्षित वर्गापर्यंतच मर्यादित राहतो तेव्हा साहित्यकार लोकप्रियतेच्या इच्छेने अथवा स्वतःच्या प्रभुत्वाचा पगडा पाडण्यासाठी तत्कालीन जनभाषेत लिहू लागतात. ती जनभाषा देखील पुनः साहित्यिक भाषा बनून व्याकरणांच्या नियमांनी जखडली जाते आणि क्रमशः दोहोत शैली, व्याकरण, शब्दभांडार, उच्चारण इत्यादीमध्ये फरक पडत जातो. अशा प्रकारचे हे रहाटगाडगे पूर्वीपासून चालत आलेले आहे. कोणत्याही सभ्य देशात कोणत्याही काळी बोली भाषा आणि साहित्यिक भाषा अशी भाषेची दोन रुपे संभवतात. थोडक्यात प्राकृत बोली भाषेपासूनच संस्कृतला सुव्यवस्थित रुप प्राप्त झाले असावे किंवा 'संस्कृत प्राकृत भाषा एकमेकापासून वेगळ्या असून त्या एकाच काळी प्रचलित असाव्यात. ' असे डॉ. गुणे यांचे मत आहे. अर्थातच हे मत अधिक ग्राह्य वाटते.

**प्राकृत भाषेचा विकास -**

प्राकृत भाषेचा विकास आणि विस्तार पहात असताना आपणाला त्याविषयी काही विव्दानांची, व्याकरणकारांची, कवि-महाकवींची मते पडताळून पहावी लागतील. पिशेल या विव्दानाच्या मते काही व्याकरणकारांनी प्राकृत शब्दाचे विश्लेषण प्राक्+कृत अर्थात् 'प्रथम तयार झालेली (भाषा) ' असे म्हणून प्राकृतला संस्कृतपेक्षाही प्राचीन भाषा मानले आहे. आपल्या नैसर्गिक स्वरुपात ही भाषा वैदिक कालापूर्वीही अस्तित्वात होती. वैदिक भाषेला त्या काळी प्रचलित असणाऱ्या प्राकृत बोलींचे साहित्यिक रुप मानले जाते. ' सर्व प्राकृत भाषांचे वैदिक व्याकरण आणि शब्दांचे अनेकविध ठिकाणी जे साम्य आहे ते संस्कृतमध्ये पाहावयास मिळत नाही. वैदिक संस्कृत आणि शिलालेखी प्राकृत या दोन्ही भाषा जणु जुळ्या बहिणी आहेत. कारण त्या दोघींचा विकास वैदिक युगातील बोलीभाषा व लोकभाषा यांच्यापासून झाला आहे. ज्यावेळी लौकिक संस्कृत भाषा प्रचलित होती त्यावेळी साधारण लोकांची बोलीभाषा देखील विद्यमान होती. ही गोष्ट आपणाला काही संस्कृत नाटकातील प्राकृतभाषी पात्रांच्या उल्लेखावरुन दिसून येते. मग असा प्रश्न उद्भवतो की, वैदिक संस्कृत आणि लौकिक संस्कृत या दोन्ही तत्कालीन प्राकृत भाषापासून उत्पन्न झाल्या असाव्यात काय ? आजकालच्या भाषा विव्दानांच्या मते तरी याच सिध्दांताला अधिक ग्राह्य मानल्याचे दिसते.

'गउडवहो' या प्राकृत महाकाव्याचा कवि ( ८ वे शतक ) वाक्पतिराज हा देखील वरील मत आपल्या काव्यतील ९३ व्या गाथेवरुन स्पष्ट करतो. तो म्हणतो -

सयलाओ इमं वाया विसंति एतोणेंति वायाओ । एंति समुद्दं चिय णेंति सायराओ च्चिय जलाहं ॥

अर्थात सर्व भाषा प्राकृत भाषेत प्रवेश करतात. या प्राकृत भाषेपासून पुनः सर्व उत्पन्न होतात. सागरात पाणी प्रवेश करुन पुनः सागरातूनच बाष्परुपाने ते बाहेर पडते.

प्राकृतपासून संस्कृतचा विकास झाला नाही, ही मान्यता आज मान्य झाली आहे. प्राकृत भाषा ही वास्तविक कृत्रिम आणि काव्याची भाषा वाटू लागण्याचे कारण असे की, कवींनी या भाषेला हवी तशी वाकवून तिचा काव्यात वापर केला आहे. परंतु पुढे हीच भाषा राजनीतीक अथवा धार्मिक इतिहासाच्या परंपरेमुळे ती साहित्यिक भाषा बनली. होस्फर, लास्सन, भांडारकर, याबोकोई इत्यादि विव्दान प्राकृतची उत्पत्ति संस्कृतपासून मानतात परंतु तसे मानणे भ्रमयुक्त ठरेल. प्राकृतचे मूळ संस्कृत नसल्याचे पिशेल या विव्दानाने सप्रमाण सिध्द करुन दाखविले आहे.

भाषा विकासाच्या दृष्टीने प्राकृतचा संकुचित अर्थच घेतला जातो. कारण इ.स. ६०० पूर्व पासून १००० इसवी सनापर्यंत सर्व भाषांना प्राकृत म्हणूनच संबोधिले आहे. या कालातील भाषांचे प्रारंभिक प्राकृत, मध्यकालीन प्राकृत आणि उत्तरकालीन प्राकृत असे तीन विभाग पाडले गेले आहेत. आरंभीच्या प्राकृतमध्ये पाली आणि शिलालेखी प्राकृत येतात. मध्यकालीन प्राकृतमध्ये महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, अर्धमागधी, पैशाची या भाषांचा समावेश होतो तर उत्तरकालीन प्राकृतमध्ये नागर, उपनागर व्राचड या अपभ्रंश भाषाची गणना केली जाते.

प्राचीन काळामध्ये संस्कृतचा प्रभाव अधिक होता. परंतु नंतर असा एक काळ आला की, संस्कृतचा वापर सर्वसामान्य लोकात राहिला नाही. सर्वप्रथम अशोकाच्या शिलालेखात व शिक्क्यामधून संस्कृत भिन्न प्राकृतचे स्वरुप आपणास पाहावयास मिळते आणि त्याचबरोबर धार्मिक ग्रंथातून पाली आणि अर्धमागधी प्राकृत साहित्य संपन्न झाल्याचे दिसते. तत्कालीन सामाजिक, राजनीतीक, धार्मिक बाबींचे तितके प्राकृतशी साम्य धारण करणारे नाही. कारण त्याकाली प्राकृत भाषा जनसाधारण लोकांची होती, परंतु संस्कृत जनतेची भाषा राहिली नव्हती.

## प्राकृतचे भेद-

प्राकृत भाषेला जसजसे साहित्यिक रुप प्राप्त होऊ लागले तसतशी या भाषेतील ग्रंथरचना देखील वाढू लागली. साहित्यातील विविध अंगाबरोबरच या भाषेचे व्याकरण देखील लिहिले जाऊ लागले. प्राचीन व्याकरणकारांच्याकडून वेळोवेळी प्राकृत भाषेचे व्याकरण लिहिले गेले. यातील काही महत्वाचे व्याकरण ग्रंथ आपणाला पुढीलप्रमाणे आढळतात. १. प्राकृत प्रकाश - वररुचि, २. प्राकृत लक्षण - चंड, ३. प्राकृत व्याकरण - हेमचंद्र, ४. प्राकृत संजीवनी - बसंतराज, ५. प्राकृत कामधेनु - लंकेश्वर, ६. प्राकृत कल्पतरु - रामतर्कवागीश, ७. प्राकृमंजरी - कालायन, ८. प्राकृत सर्वस्व - मार्कण्डेय, ९. प्राकृत व्याकरण - शुभचंद्र, १०. संक्षिप्तसार प्राकृतवाद - कुमदीश्वर इत्यादि.

या विविध व्याकरणकारांनी प्राकृत भाष्क्षेचे भेद आपापल्या ग्रंथातून उल्लेखित केले आहेत. प्राचीन प्राकृत व्याकरणकार वररुचीने आपल्या प्राकृत-प्रकाश व्याकरणामध्ये महाराष्ट्रभ्, पैशाची, मागधी आणि शौरसेनी यांचा उल्लेख केला आहे. हेमचंद्राने या चार भाषांच्याशिवाय चूलिका, पैशाचिक, आर्षअर्धमागधी आणि अपभ्रंशाचा उल्लेख केला आहे. त्रिविक्रम, लक्ष्मीधर, सिंहराज, नरसिंह यांनी हेमचंद्राचेच अनुकरण केले आहे. त्रिविक्रमाशिवाय इतरांनी शौरसेनी, मागधी, पैशाची, चूलिका, पैशाची आणि अपभ्रंश भाषा यांनाच षड्भाषा असे म्हटले आहे. मार्कण्डेयाने या सहा भाषांच्या ठिकाणी सोळा भाषांचा उल्लेख केला आहे. त्याच्या

मतानुसार प्राकृतचे भाषा, विभाषा, अपभ्रंग आणि पैशाच या चार भागात विभाजन केले आहे. भाषा विभागात महाराष्ट्री, शौरसेनी, प्राच्या, आवंति, मागधी, दाक्षिणात्य व बाह्यलोकी ; विभाषामध्ये शाकारी, चांडाळी, शाबरी, आमीरीकी, ढक्की इत्यादींचा समावेश आहे. अपभ्रंश भाषेत नागर, उपनागर, व्राचड व पैशाची मध्ये कैकय, शौरसेन आणि पांचाल इत्यादि भाषांची गणना केली आहे. रामतर्कवागीश व पुरुषोत्तम यांनी मार्कण्डेयाच्याच मताला मान्यता दिली आहे.

प्राकृत भाषेचे विविध व्याकरणकारांनी सांगितलेले हे वर्गीकरण तितकेसे स्पष्ट तथा उचित वाटत नाही. प्राचीन प्राकृत, मध्यवर्ती प्राकृत व आर्वाचीन प्राकृत असे कालभेदानुसार केलेले वर्गीकरणही परिपूर्ण वाटत नाही. म्हणून प्राकृतचे सुव्यवस्थित विभाजन आपणाला पुढीलप्रमाणे करता येईल.

**१. शिलालेखी प्राकृत -** अशोककालीन शिलालेख व ताम्रपटात आढळणारी प्राकृत.

**२. धार्मिक प्राकृत -** बौध्द धार्मिक प्राकृत, पाली, जैनांची अर्धमागधी, याशिवाय जैन महाराष्ट्री तथा जैन शौरसेनी या भाषांचा समावेश होतो.

**३. व्याकरणकारांची प्राकृत -** वररुचि तथा भरतापासून मार्कण्डेय, रामतर्कवागीश या व्याकरणकारांनी उल्लेखिलेल्या प्राकृत भाषा तथा विभाषा.

**४. साहित्यिक प्राकृत -** यात महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, पैशाची व अपभ्रंश साहित्यिक भाषांचा समावेश होतो.

**५. नाटकीय प्राकृत -** भास अश्वघोषापासून नंतरच्या नाटककारापर्यंतची भाषा प्राच्या, आवंती, ढक्की, शकारी, चांडाळी यांचा समावेश होतो.

**६. व्यावहारिक तथा मिश्र संस्कृत-** संस्कृतचे प्रकृतीभूतरुप उदा.-महाभारत पुराणांची व्यावहारिक संस्कृत बौध्दांची मिश्र संस्कृत तसेच बौध्द मिश्र संस्कृत व जैनांचे काही ग्रंथ.

स्थूलमानाने प्राकृत भाषांचे सहा प्रमुख प्रकार पाडले आहेत. १. मागधी ( अर्धमागधी ) प्राकृत, २. महाराष्ट्री प्राकृत, ३. शौरसेनी प्राकृत, ४. पैशाची प्राकृत, ५. चूलिका पैशाची प्राकृत, ६. अपभ्रंश प्राकृत.

जैन आगम व आगतेतर साहित्याशी निगडित असणाऱ्या अशा अर्धमागधी, महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी व अपभ्रंश याच भाषांचा याठिकाणी सविस्तरपणे विचार करण्यात आला आहे. इतर भाषांची सविस्तर माहिती याठिकाणी देणे उचित ठरणार नाही.

### अर्धमागधी

जैन आगमाची भाषा अर्धमागधी भाषा म्हणून ओळखली जाते. समवायांगसूत्र, व्याख्याप्रज्ञप्ति सूत्र, औपपातिक सूत्र या प्राचीन जैन ग्रंथांची भाषा अर्धमागधी भाषा असल्याचे दिसते. बौध्दानी त्रिपिटकाच्या भाषेला ज्याप्रमाणे 'पाली' म्हटले आहे, तसेच प्राचीन जैन आगम ग्रंथातील भाषा 'अर्थमागधी' असल्याचे मानले आहे. भ. महावीरांनी आपला हितोपदेश याच अर्धमागधी भाषेत दिला आणि त्यांच्या गणधरांनी याच भाषेव्दारे सूत्र ग्रंथांची रचना केली. ' अर्धमागधी भाषेला आर्ष अर्थात् 'ऋषींची भाषा' असे म्हटले आहे. हेमचंद्राने आपल्या प्राकृत व्याकरणात आर्ष भाषेचा उल्लेख करुन, व्याकरणाचे सर्व नियम आर्ष भाषेला लागू नाहीत, कारण तिच्यात अनेक अपवाद असल्याचे सांगितले आहे. त्रिविक्रमाने प्राकृत शब्दानुशासनमध्ये आर्ष व देशी भाषा या रुढीगत असून त्यांना व्याकरणाची आवश्यकता नसल्याचे म्हटले आहे. रुद्रटाच्या काव्यालंकारावर टीका लिहीत असताना नमिसाधून आर्ष भाषेला अर्धमागधी म्हणून ती देवांची भाषा असल्याचे सांगितले आहे. तसेच आबालवृध्दापासून अशिक्षित लोकासहित सर्वांना आपला हितोपदेश समजावा म्हणून या भाषेचा स्वीकार केला असावा. एवढेच नव्हे तर आर्य, अनार्य, पशू, पक्षी यांच्यापर्यंत ही भाषा समजू शकते, पोहचू शकते. म्हणूनच तिचा वापर भगवंतानी केला असावा. यावरुन हे सिध्द होते की, बौध्दांनी मागधी भाषेला सर्व भाषांचे मूळ मानले आहे त्याचप्रमाणे जैनांनी अर्धमागधीला व व्याकरणकारांनी आर्ष भाषेला मूळ भाषा म्हणून स्वीकृती दिली आहे. या अर्धमागधीपासून काही अन्य भाषा अथवा बोली यांचा उद्‌गम झाला असावा.

अर्धमागधी भाषा प्रामुख्याने मगध आणि शूरसेन यांच्यामधील प्रदेशात बोलली जात होती. तिचा काल इ.स. २ रे शतक मानला जातो. काहींच्या मते अर्धमागधीत मागधीची वैशिष्ठ्ये अधिक आढळतात, ती मागधाच्या अर्ध्या भागात बोलली जात होती, म्हणून तिला अर्धमागधी म्हटले असावे. काही विव्दानांच्या मतानुसार अवध व भोजपुर या प्रदेशाची तत्कालीन भाषा अर्धमागधी होती.

भरताने नाट्यशास्त्रात (१७.४८) मागधी, अवंती, प्राच्या, शौरसेनी, वाह्लीका, दाक्षिणात्या या भाषांच्या बरोबर अर्धमागधी भाषेला सात भाषेत असल्याचे मानले आहे. निशीथचूर्णीकाराने १८ भाषेत अर्धमागधीचा समावेश केला आहे. हेमचंद्राने जैन आगमाची भाषा अर्धमागधी असल्याचे मानले असले तरी, तिच्यात वेगळी